International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# जागतिकीकरण : समाज आणि आंबेडकरवादी भूमिका

**प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम**
*मराठी विभाग प्रमुख,*
*श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद, जिल्हा. यवतमाळ*
***Corresponding Author – प्रा.विक्रांत कृष्णराव मेश्राम***
**DOI - 10.5281/zenodo.15240906**

**प्रस्तावना:**

जागतिकीकरणाचा सर्वात आधी जो बळी गेला, तो म्हणजे या देशातील शेतकरी, गिरणीतील कामगार, फुटपातावर लहान -लहान धंदे करणाऱ्या व उद्याची सुंदर स्वप्ने मेंदूत घेऊन जगणारा... लहान ..लहान दुकाने हे तर ,आज अदृश्य झाले आहेत, आणि जगातील जे काही छोटी-छोटी व्यवसाय आहेत आणि ती करणारी व्यक्ती, अशा सर्व व्यक्तींना व व्यवसायांना मोठ्या व्यवसायाने गिळंकृत केले आहे

जागतिकीकरणामुळे कमालीची विषमता या देशात निर्माण झाली. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यामुळे या देशातील जो वंचित घटक आहे. अभावग्रस्त समूह आहे. या लोकांच्या वाट्याला कितपत आनंददायी जीवन त्यांच्या वाटेला येईल याबद्दल शंका निर्माण होते. अशा जीवघेण्या प्रक्रियेचा वेध आंबेडकरी साहित्यिकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून घेतला आहे. त्यापूर्वी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा पूर्व इतिहास, स्वरूपाचा पुढील प्रमाणे विचार करून साधारणपणे १९२९ च्या जागतिक मंदीवर मात करण्यासाठी अमेरिकेने भांडवलशाहीवर आधारित असणाऱ्या बंदिस्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला .या अर्थव्यवस्थेच्या धोरणानुसार मालकावरील जकात कर ३८ टक्क्यांवरून ५२ टक्के पर्यंत वाढविण्यात आले. याचा विपरीत परिणाम होऊन अमेरिकेचा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील व्यापारी हिस्सा १३.८ टक्क्यावरून ९.९ टक्के पर्यंत खाली घसरला, व इतर युरोपीय राष्ट्रे याच मार्गाने गेल्यामुळे त्यांना देखील या धोरणाचा फटका बसला. या परिस्थितीवर उपाय शोधण्याच्या दृष्टिकोनातून १९४४ मध्ये अमेरिकेतील 'ब्रिटनवूड 'येथे घेण्यात आलेल्या परिषदेला आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु, असे करण्यास अमेरिकेच्या कायदेमंडळाने नकार दिल्यामुळे 'गॅटचा 'जन्म झाला. व्यापार आणि जकात विषयक सार्वत्रिक करारानुसार ...

जागतिकीकरणाची प्रक्रियेला जेव्हा प्रारंभ झाला होता, तेव्हा या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे दुष्परिणाम इतके विदारक होतील हे सर्व सामान्य माणसांच्या लक्षात त्यावेळेस येणे अशक्यच होते. पण आज या प्रक्रियेमुळे या देशातील सर्वसामान्य माणूस हा पीसला जात आहे , भरडला जात आहे अनेक समस्या त्याच्यापुढे उभ्या आहेत. रोज नवीन समस्येला त्याला पुढे जावे लागत आहे. आता या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेच्या समस्येतून या देशातील सर्वसामान्य माणसांची मुक्तता कशी होईल, यासाठी प्रबोधनाच्या माध्यमातून व विचाराच्या माध्यमातून आंबेडकरवादी कविता आपली भूमिका निष्ठेने पार पाडत आहे. जेव्हा आपण एखादा आंदोलन उभारतो किंवा अन्याय झालेल्या गोष्टीबद्दल संघर्ष उभा करतोय. न्याय मागण्यासाठी जेव्हा आपण रस्त्यावर उतरतो. तेव्हा त्या आंदोलनाला, त्या संघर्षाला, त्या न्याय मागण्याच्या

प्रक्रियेला, भूमिका तर असावीच लागते सोबत निष्ठाही असावी लागते केवळ भूमिका आणि निष्ठा असून भागत नाही,तर वंचित, उपेक्षित, अभावग्रस्त मानव समूहाला जिवंत ठेवण्यासाठी त्यांच्या न्याय हक्कासाठी निष्ठेने रस्त्यावर उतरून न्याय मागता देखील आला पाहिजे. जेव्हा जेव्हा आंबेडकरी समाजावर अन्याय.. अत्याचार झालेत, आई बहिणींची नग्न धिंड काढण्यात आली, त्यांना जिवंत जाळण्यात आले. सार्वजनिक.. नैसर्गिक पानवट्यावरून बहिष्कृत करण्यात आले.अशा परिस्थितीमध्ये आंबेडकरी समूहाने एकनिष्ठा आणि भूमिका घेऊन रस्त्यावर उतरला आहे आंदोलनात सहभागी झाला आहे. आणि आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष उभारले आहे. जागतिकीकरण ही प्रक्रिया केवळ आंबेडकरी समूहालाच घातक आहे असे नाही, तर या देशातील जो जो वंचित आहे. उपेक्षित आहे .अभावग्रस्त आहे. त्या सर्व समूहासाठी ही प्रक्रिया घातक आहे. हे समजून घेणे गरजेचे आहे, मात्र असे होताना दिसत नाही. या देशातील प्रत्येक समूह आपापल्या जातीत धर्मात तो इतका गुंतून गेला आहे, की त्याला जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आपला जो घात होत आहे किंवा आपण आणि आपली येणारी पिढी कशी उध्वस्त होत आहे .हे त्याच्या डोक्यात निर्माण होत नाही किंवा त्याच्या डोक्यात ते निर्माण होऊ नये यासाठी देखील रोज नवनवीन क्लृप्त्या तयार करून या देशातील अभावग्रस्त समूहांना गुंतून ठेवल्या जाते आहे .कधी जातीच्या नावावर, कधी धर्माच्या नावावर, कधी वर्गणीच्या नावावर ,कधी आरक्षणाच्या नावावर, कधी राजकारणाच्या नावावर, अंधश्रद्धेच्या नावावर…जागतिकीकरणाची प्रक्रिया इतकी विघातक आहे की त्यातून कोणताही सर्वसामान्य माणूस सुटूच शकत नाही. अशा परिस्थितीत आंबेडकरवादी कवितेने आपली भूमिका या प्रक्रिये विरुद्ध स्वीकारली आहे .आणि ती रस्त्यावर येत आहे/आली आहे .केवळ ती रस्त्यावर येऊन चालणार नाही ,तर तिच्या सोबतीला या देशातील सर्वत्र उपेक्षित ,वंचित, अभावग्रस्त , समुहाने एक भूमिका, एकनिष्ठा घेऊन ,हातात हात घेऊन रस्त्यावर उतरणे गरजेचे आहे.

या संदर्भात कवी केतन पिंपळापुरे म्हणतात," आजचा काळ आपल्याकरिता सोफा राहिलेला नाही. नवीन आव्हाने पावला पावलांवर उभी आहेत. नव्या समस्या आपल्या शीरावर तलवारी सारख्या टांगल्या गेल्या आहेत. नवे धोके आपल्या विकासाच्या मार्गात दबा धरून बसले आहेत. हे नीट समजून घ्या.. कालपर्यंत आपल्यासाठी बाबासाहेबांनी मिळवलेल्या आरक्षणामुळे आपल्या कालची एक पिढी समाधानाने जगली. आज तेच धोक्यात आले, म्हणण्यापेक्षा तसेच स्थिती निर्माण केली गेली. तर दुसरीकडे खाजगीकरणाचा बुलडोजर सार्वजनिक उद्योगांवर चालविला जात आहे. ब्राह्मणी भांडवलशाही जागतिकीकरणांमध्ये अधिक मुजोर झाली आहे. ती सत्तेतल्या दलाला ऐवजी आता स्वतःच सत्तेत येण्याचे मनसुबे रचित आहे. अशा ब्राह्मणी भांडवलशाहीच सत्तेसमोर आता आपल्याला आपल्या हक्काचे लढाई लढावे लागणार आहे.( अध्यक्षीय भाषण: आंबेडकरी विद्यार्थी साहित्य संमेलन, २९ नोव्हेंबर २००८, अमरावती)

जागतिकीकरण आणि मराठी साहित्य या संदर्भामध्ये डॉ. मंगेश बनसोड म्हणतात," आज 'ग्लोबल व्हिलेज' ही संकल्पना सर्वत्र रुजली आहे. मात्र या ग्लोबल गाव कुसाच्या बाहेर अजूनही गावाची वेस कायमच आहे. एकीकडे आम्ही ग्लोबल होण्याच्या कितीही गप्पा करत असलो, तरी आजही या वेशीबाहेर एक माणूस दुसऱ्या माणसाची विष्ठा डोक्यावर वाहण्याचं अतिशय हिन दर्जाचं काम करतो आहे. मात्र त्याविषयीही कोणीही बोलायला तयार नाही. त्याविषयी आपण बोललं पाहिजे. आमच्या आजूबाजूला वावरणाऱ्या कष्टकरी, कामगार ,हमाल, वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रिया, तृतीयपंथी यांच्या दुःखाविषयी तळागाळातल्या माणसाविषयी. कर्जाचा डोंगर छातीवर ठेवून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांविषयी, देशासाठी शहीद झालेल्या

जवानांविषयी .त्यांच्या दुःखी परिवाराविषयी. या पृथ्वीतलावरील तमाम दु:खीतांच्या दुःखाला आमच्या साहित्यातून कलाकृतीमधून वाचा देण्याचं काम आम्ही केलं पाहिजे. त्यांच्यासोबत आपण उभं राहिलं पाहिजे. आणि आम्ही बोललं पाहिजे. सांस्कृतिक दहशत निर्माण करणाऱ्यांच्या विरोधात! ही आंबेडकरी म्हणून घेणाऱ्या प्रत्येक लेखक, कवी ,कलावंतांची नैतिक जबाबदारी आहे. (अध्यक्षीय भाषण: सातवे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन, रविवार दिनांक २६ फेब्रुवारी २०१७, यवतमाळ)

कवी: अशोक इंगळे, आयडेंटिटीचे ब्रँडेड युद्ध हे कविता संग्रह १९ फेब्रुवारी २०२२ ला प्रकाशित झाले या कवितासंग्रहाच्या माध्यमातून कवी अशोक इंगळे यांनी जागतिकीकरणाच्या संदर्भात अजून मी थांबलो नाही, पुन्हा पुन्हा अणूरेणुचा शोध घेत,ई-कागदावरची कविता एक आयडिया,तुझ्या स्वागतासाठी, जागतिकीकरणाची दशसूत्री,येथून पुढे,रमाई,लढण्याचा मार्ग, गावाच्या इंस्टंट प्रगतीसाठी…

तूर्तास, अजून मी थांबलो नाही
अजून आटले नाहीत
माझ्या पायाखालचे खोल खोल झरे
थकल्या नाहीत माझ्या रक्ताळलेल्या पाऊलवाटा
तुटली नाही बेंबीपासून शब्दांची नाळ
मला प्रदीप्त करायचा आहे ग्लोबलायझेशन
काळ.(पृ.२३)

कवी विद्याधर बनसोडे यांनी' इवान',' वर्तमानाचा सातबारा',' सूर्याला दिवस जातात तेव्हा', 'प्रश्न पाणी बदलण्याचा आहे', 'फिनिक्स पक्षांच्या कविता' या कवितासंग्रहाच्या माध्यमातून त्यांनी जागतिकीकरणात आंबेडकरवादी कवितेवर झालेला परिणाम अभिव्यक्त केला आहे.

'इवान' या कवितासंग्रहातून….
हे माझ्यापुढून धावत जाणारे नवे शतक
माणसांच्या खांद्यावर जुन्या प्रश्नांचे ओझे
त्यात
मशीन सारखी धावत जाणारी माणसे
उरफुटेस्तोवर धावत जाण्याची स्पर्धा
अर्धा रोबोट; माणूस अर्धा
या शतकाने
माझ्या ओंजळीत दिलेले प्रश्नायन
माझ्या भोवती प्रश्न.. प्रश्न.. प्रश्न
मी करत बसतो पोस्टमार्टम
या प्रश्नांचे
(पृ.१०)

कवी सुरेश खोब्रागडे यांच्या वेळेवर येणारे इतर विषय या कवितासंग्रहाच्या माध्यमातून त्यांनी जागतिकीकरणाचा आंबेडकरवादी कवितेवर झालेला परिणाम अभिव्यक्त केले आहे. यामध्ये गावभर धुके पसरले आहे, आताशा मी खूप दूर गेलोय, डेंजर झोन, वेळेवर येणारे इतर विषय, एखाद्या बेवारस कुत्र्यांच्या केकटण्याशिवाय, हे माझ्या पुरातन सखे, हे माझ्या प्रिय ग्लोबल देशा, एम्प्रेस मिल ते एम्प्रेस मॉल ,माणूस डस्टबिन का होऊ पाहतो…

आताशा कुणीच कुणाला स्पष्ट दिसत नाहीत.
गाव फार धुक्यात हरवलाय
तो गजबज, तो सुखाचा गोंधळ
तो साराच समूहातला आकांत
हे …हे सारे आता संपल्यात जमा झालेत.
स्मशान शांतता, भयान काळोख, मायेचा दुरावा याशिवाय फारसं काही उरलं नाही गावात.
ग्लोबलायझेशनच्या या दुनियेत
माझ्या गावातील माणूस
माझ्यापासून फार दूर गेलाय
….. आणि माझी सावलीसुद्धा!
( पृ.४४)

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1. सेन अमर्त्य : अस्मिता आणि हिंसाचार नियतीविषयी भ्रम पेंग्विन बुक्स, नवी दिल्ली, २००९ पृष्ठ क्रमांक २३.

2. तेलतुंबडे आनंद :जागतिकीकरण आणि समाजवादाचे भवितव्य, ऊर्जा श्रमिक मुखपत्र स्मरणिका, २००७ पृष्ठ क्रमांक २३१.
3. कांबळे उत्तम :जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न ,ऊर्जा श्रमिक मुखपत्र स्मरणिका २००० पृष्ठ क्रमांक १५.
4. पळवेकर अशोक :जागतिकीकरण: साहित्य समाज आणि सांस्कृतिक पर्यावरण, ऊर्जा श्रमिक मुखपत्र स्मरणिका २००७ पृष्ठ क्रमांक १५३.
5. दुबे अशोक :(संपा) भारत का भूमंडलिकरण पृष्ठ क्र.२१. ६.थोरात सुखदेव :दलित निरंतर, विषमता आणि दारिद्र्य, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे २००७ पृष्ठ क्र.२२४.
6. काळे अरुण :नंतर आलेले लोक ,लोकवाङ्मयगृह , मुंबई २००६.
7. भवरे महेंद्र: महासत्तेचे पीडादान, मुंबई २००५ मनोगत.
8. कांबळे उत्तम: जागतिकीकरणात माझी कविता, सुगावा प्रकाशन पुणे २००६ पृष्ठ क्र ९.
9. कांबळे उत्तम :(संपा)जागतिकीकरणात मराठी कविता, परचुरे प्रकाशन मुंबई २००९ पृष्ठ क्र ४१.
10. भवरे महेंद्र: मराठी कवितेचे नव्या दिशा, प्रकाशक लोक वाङ्मय गृह मुंबई.
11. मोरे सतेश्वर: प्रस्तावना , कवितासंग्रह,वेळेवर येणारे इतर विषय ,पृष्ठ क्रमांक २३.
12. कांबळे उत्तम :आंबेडकर साहित्य, व्दारा.विक्रांत कृष्णराव मेश्राम,प्रकाशक आशय:आंबेडकरी साहित्य, संस्कृती व संवर्धन मंच ,बडनेरा अमरावती.
13. मोरे सतेश्वर :अध्यक्ष भाषण :तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन वर्धा, पृष्ठ क्र. ५.
14. तैत्रव पृ.६.
15. बनसोड मंगेश: अध्यक्षीय भाषण: सातवे आंबेडकर युवा साहित्य संमेलन यवतमाळ,
16. कांबळे उत्तम :जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, १५ सप्टेंबर २००२, सुगावा प्रकाशन, पुणे.
17. पिंपळापुरे केतन: अध्यक्षीय भाषण: आंबेडकर विद्यार्थी साहित्य संमेलन अमरावती, २००८.
18. पाटील म.सू: दलित कविता व दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, पद्मगंधा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती २०१०.
19. इंगळे डॉ. अशोक: नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा,शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर.
20. पाटील डॉ.विलास:नामांतर संघर्ष गाथा, सुधीर प्रकाशन वर्धा, १४एप्रिल २०२४.
21. मस्के डॉ. बी .आर.: विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, नभप्रकाशन अमरावती १४ एप्रिल २०१२.
22. ढाले राजा:दलिते पँथरची संस्थापना :वस्तुस्थिती आणि विपर्यास, प्रकाशक: फुले- आंबेडकर विचार प्रसार केंद्र पुणे, ६ डिसेंबर २०२२.
23. जाधव.रा.ग.: साठोत्तरी मराठी कविता व कवी , साकेत प्रकाशन औरंगाबाद.
24. भवरे .डॉ. महेंद्र :दलित कवितेतील नवे प्रवाह, शब्दालय प्रकाशन ,श्रीरामपूर.
25. खंडेराव हरीश : आंबेडकरी चळवळ आणि साहित्य सांस्कृतीक इतिहास, खंड १, प्रज्ञा प्रकाशन उल्हासनगर जिल्हा. ठाणे २०१२.
26. वानखडे डॉ. कैलास :दलित कवितेची निर्मिती प्रक्रिया, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, १४जानेवारी २०१९.
27. नागदिवे रोहन:स्थितीचा ओला कोलाज, यथार्थ प्रकाशन बडनेरा -अमरावती,३१ मार्च २००७.
28. थोरात डॉ. आशाताई : अध्यक्षीय भाषण ग्रामीण आंबेडकर साहित्य संमेलन, दि.२,३फेब्रुवारी २०१९,अंजनगाव बारी, जिल्हा .अमरावती.
29. गायकवाड आनंद : अध्यक्षीय भाषण राज्यस्तरीय आंबेडकरी साहित्य संमेलन उमरखेड, यवतमाळ
30. कांबळे डॉ. ऋषिकेश :दलित कविता आणि अमेरिकन ब्लॅक पोएट्री ,गोदा प्रकाशन औरंगाबाद.

31. कांबळे उत्तम: अध्यक्षीय भाषण तेरावे कामगार साहित्य संमेलन, दिनांक २० व २२जानेवारी २००६ अमरावती.
32. शेंडे डॉ. वसंत : अध्यक्षीय भाषण आंबेडकर साहित्य संमेलन ,दिनांक २६ एप्रिल २०१९अकोला.
33. खोब्रागडे प्रा. दीपककुमार : अध्यक्षीय भाषण पहिले अखिल भारतीय आंबेडकरवादी साहित्य संमेलन चिमूर, जिल्हा .चंद्रपूर.
34. मनोहर डॉ.यशवंत :दलित साहित्याचे नामांतर आंबेडकरवादी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन नागपूर,६डिसेंबर २००५.
35. अहिरे डॉ. प्रतिभा : अध्यक्षीय भाषण पाचवे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन अकोला. दिनांक २०,२१ एप्रिल२०१३.
36. अजमेरा सूर्यकांता ,उपर्वट विनोद (संपा), जागतिकीकरण आणि मराठी भाषा, अथर्व पब्लिकेशन, धुळे २०११.
37. गायकवाड शरद, शिंदे सुनील ( संपा), जागतिकीकरण आणि मराठी साहित्य, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे २००९.
38. पंडित नलिनी :जागतिकीकरण आणि भारत, लोक वाङ्मय गृह ,मुंबई २००४.
39. भागवत विष्णू :जागतिकीकरण नवीन गुलामगिरी, समता प्रकाशन नागपूर, तृतीय आवृत्ती २००७.
40. शोभणे रवींद्र (संपा), जागतीकरण समाज आणि मराठी साहित्य ,विजय प्रकाशन, नागपूर ,प्रथम आवृत्ती २०१२.